RNI No. MAHBIL/2009/35526

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-क

वर्ष १२, अंक ५] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १२-१८, २०२६/माघ २३-२९, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ६.००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले ( भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर ) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त ( राज्य उत्पादन शुल्क ), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय

रॉयल इन्शुरन्स इमारत, ५वा मजला, ज. टा. मार्ग,
चर्चगेट, मुंबई ४०० ०२०, दिनांक ३ फेब्रुवारी २०२६.

**वाचा.**— (१) दि केरोसीन (रेस्ट्रिक्शन ऑन युज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्राईस) ऑर्डर, १९९३.
(२) शासन पत्र क्रमांक रॉकेल-२०१८/प्र.क्र.१/ना.पु. २७, दिनांक १४ मे २०१८.
(३) क्रमांक निशि/केरो/ आठ/अधिसूचना/२०२६/जा. ०१, दिनांक ५ जानेवारी २०२६.
(४) राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांचा दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी प्राप्त ई-मेल संदेश.

### अधिसूचना

क्रमांक निशि/केरो/आठ/अधिसूचना/२०२६/जा. ११.— शासनाने वाचा क्र. २ च्या पत्रान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांच्याकडून सुधारित डेपो दर प्राप्त करून घेऊन त्याआधारे केरोसीनचे दर सुधारित करण्याची कार्यवाही करावी, असे आदेशित केले आहे ;

ज्याअर्थी, सुधारित एक्स-डेपो दराचा तक्ता सोबत पाठवून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील एक्स-डेपो दरामध्ये दिनांक १ फेब्रुवारी २०२६ पासून सुधारणा केलेली असल्याचे राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई यांनी या कार्यालयास वाचा क्र. ४ च्या ई-मेल संदेशाद्वारे कळविले आहे.

त्याअनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या केरोसीनचा सुधारित कमिशनसह घाऊक व किरकोळ विक्री दर निश्चित करून त्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, वाचा क्र. १ मध्ये नमूद तरतुदीस अनुसरून मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर) केरोसीनच्या घरगुती वापराचे घाऊक व किरकोळ विक्रीचे दर दिनांक १ फेब्रुवारी २०२६ पासून पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ अंमलात आणणेकरिता पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे.—

| अ.क्र. | बाब | सध्याचा दर (रुपये प्रति कि. लि.) | सुधारित दर (रुपये प्रति कि. लि.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ए | एक्स-डेपो दर (रुपये प्रति कि. लि.) | ५३१९५.०० | ५१८०१.०० |
| बी | वस्तू व सेवा कर (जीएसटी) @ ५% | २६५९.७५ | २५९०.०५ |
| सी | घाऊक विक्रेत्यासाठी एकूण खरेदी किंमत [ ए+बी] | ५५८५४.७५ | ५४३९१.०५ |
| डी | (*i*) घाऊक विक्रेत्याचे कमिशन | १३४१.८८ | १३४१.८८ |
| | (*ii*) तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तूटीच्या प्रतिपूर्तीसाठी असाधारण भत्ता. | ९९.०० | ९९.०० |
| | (*iii*) (A) वाहतूक खर्च | २८०.७९ | २८०.७९ |
| | (B) डिझेल व्यतिरिक्त अनुषंगिक बाबींचा खर्च | ७०.२० | ७०.२० |
| | (C) डिझेलवरील खर्चात झालेली वाढ | १०४.२८ | १०४.२८ |
| | एकूण वाहतूक खर्च (A+B+C) | ४५५.२७ | ४५५.२७ |
| | (*iv*) पथकर (Toll Tax) | ७०.०० | ७०.०० |
| | (*v*) घाऊक वितरकांना पूर्णांकाचा लाभ | १.९५ | ५.४७ |
| | (*vi*) एकूण किंमत वाढ [ डी (*i*) + डी (*ii*) + डी (*iii*) + डी(*iv*) + डी (*v*)] | १९६८.१० | १९७१.६२ |
| इ | एकूण किंमत वाढीवर, वस्तू व सेवा कर (जीएसटी) @ ५% [ डी (*vi*) च्या ५%] | ९८.४१ | ९८.५८ |
| एफ | एकूण [ सी + डी (*vi*) + इ ] घाऊक विक्रीचा दर | ५७९२१.२६ | ५६४६१.२५ |
| एफ १ | किरकोळ विक्रेत्यासाठी खरेदी किंमत | ५७९२१.२६ ** (किंमत रुपये ५५१६३.१० + वस्तू व सेवा कर रुपये २७५८.१६) | ५६४६१.२५ ** (किंमत रुपये ५३७७२.६२ + वस्तू व सेवा कर रुपये २६८८.६३) |
| जी | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तूटीच्या लाभांसह) | ६७५.०० | ६७५.०० |
| एच | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तूटीच्या लाभांसह) वर टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) [ जी च्या ५ टक्के ] | ३३.७५ | ३३.७५ |
| आय | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति किलो लिटर) | ५८६३०.०१ ** (किंमत रुपये ५५८३८.१० + वस्तू व सेवा कर रुपये २७९१.९१) | ५७१७०** (किंमत रुपये ५४४४७.६२ + वस्तू व सेवा कर रुपये २७२२.३८ |
| जे | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति लिटर) | ५८.६३ | ५७.१७ |

शासन परिपत्रक क्रमांक अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक केईआर-१३७६/३७६९/१७, दिनांक १७ डिसेंबर १९७६ नुसार पूर्णांकाचा लाभ एकाच पातळीवर (घाऊक वितरक) घाऊक दरामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

**चंद्रकांत डांगे** (भा.प्र.से.),
नियंत्रक, शिधावाटप व संचालक,
नागरी पुरवठा, मुंबई.

मुंबई,
दिनांक ३ फेब्रुवारी २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.